# जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कार्यालय
## पाणी वाहतुक निविदा सूचना

**क्र.टंचाई/कार्या-१९/अ-/१८१/२०१२** **अहमदनगर दिनांक ०६/०२/२०१२**

अहमदनगर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी दिनांक ०१/०१/२०१२ ते ३१/१२/२०१२ या कालावधीसाठी ७५०० ते १२००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या बसविलेले ट्रक याबाबत जिल्हाधिकारी अहमदनगर मोहारबंद निविदा मागवित आहेत. कोरे निविदा फॉर्म रु. १०००/- (एक हजार मात्र) शासकिय खजिन्यात " ०२५० इतर सामाजिक सेवा - ८०० इतर जमा (रोख जमा) (०२५०००२८००) या सदराखाली भरुन नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मिळतील. सदरची रक्कम परत मिळणार नाही.

| कोरे निवीदा फॉर्म विक्रीचा कालावधी | सीलबंद निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | सिलबंद निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|
| दिनांक - ०७/०२/२०१२<br>(वार - मंगळवार ) पासून<br>दिनांक - १४/०२/२०१२ (वार मंगळवार )<br>(कार्यालयीन वेळेत, सुटीचे दिवस वगळून) व<br>दि.१५/०२/२०१२ रोजी दुपारी २.०० वा.पर्यत | दिनांक - १५/०२/२०१२<br>(वार - बुधवार ) रोजी<br>दुपारी ३.०० वाजेपर्यंत<br>स्थळ-नायब तहसिलदार, टंचाई शाखा,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर | दिनांक - १५/०२/२०१२ रोजी<br>दुपारी ४.०० वा.<br>स्थळ-नियोजन भवन / नगर निवास,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर |

१) निविदेच्या शर्ती व अटी जिल्हाधिकारी कार्यालय (टंचाई शाखा), अहमदनगर येथे कार्यालयीन वेळेत (सकाळी १०-०० ते दुपारी ५-३० पर्यंत ) विनामूल्य पाहवयास मिळतील.

२) निविदा सादर करताना निविदेसोबत बयाणा रक्कम **रु.५०,०००/-(पन्नास हजार मात्र) तहसीलदार सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांचे नावे अहमदनगर** येथे देय असलेला कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डि.डि.) निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे व **रु ५.००** लक्ष रकमेची जिल्हाधिकारी अहमदनगर या नावाने राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी (कालावधी १७/०२/२०१२ ते ०१/०१/२०१३) निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे.

३) निविदा फॉर्म पोष्टाने पाठविले जाणार नाहीत. तसेच मोहारबंद निविदा प्रत्यक्षात नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर येथे **दिनांक १५/०२/२०१२ रोजी (वार बुधवार ) वेळ ३.०० वाजेपर्यत** स्विकृत करण्यात येतील.पोष्टाने प्राप्त होणा-या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

४) मोहरबंद निविदा दिनांक- **१५/०२/२०१२ (वार - बुधवार) रोजी दुपारी ४.०० वा.)** नियोजन भवन / नगर निवास, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे उघडण्यात येतील.

५) निविदापूर्व बैठक **दिनांक १३/०२/२०१२ रोजी (वार- सोमवार ) वेळ ४.३०** वा. नियोजन भवन/निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या दालनात घेण्यात येईल.

६) कामाचा कालावधी हा दिनांक फेब्रुवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१२ पर्यंत राहिल.

७) कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांनी राखीव ठेवले आहेत.

८) प्रस्तुत निविदा ही **www.ahmednagar.nic.in** वर पाहावयास मिळेल.निविदा वेबसाईटवरुन डाउनलोड करुनही सादर करता येतील मात्र निविदा सादर करताना **रु.१०००/- '०२५० इतर सामाजिक सेवा, ८०० इतर जमा (रोख जमा) (०२५०००२८००)'** या लेखाशिर्षाखाली जमा केलेचे चलन किंवा तहसीलदार सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांचे नावे अहमदनगर येथे देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डि.डि.) सादर केल्या नंतरच निविदा स्विकारणेत येईल.

९) निविदेसंबंधी उपरोक्त तारखांमध्ये फेरबदल झाल्यास त्याची सुचना मुद्दा क्रमांक ८ मध्ये नमूद केलेल्या संकेत स्थळावर तसेच जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल.व्यक्तिगत सुचना देणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

**साक्षांकित**
**जिल्हाधिकारी अहमदनगर**

# जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कार्यालय

## पाणी वाहतुक निविदा सूचना

**क्र.टंचाई/कार्या-१९अ/१८१/२०१२ -प्रस्तावना- अहमदनगर दिनांक- ०६/०२/२०१२**

अहमदनगर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त क्षेत्रात पिण्याचे पाण्याची वहातूक करण्यासाठी दिनांक **०१/०२/२०१२ ते ३१/१२/२०१२** या कालावधीसाठी **७५०० ते १२००० लिटर** क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या बसविलेले ट्रक पुरविणेबाबत निविदाधारकांकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

**निविदा मिळण्याचे ठिकाण - नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अ.नगर ४१४००१.**

**निविदेची फॉर्म भरणेची पध्दत व फी -**

निविदेचा नमुना नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे **दिनांक ०७/०२/२०१२** (वार- मंगळवार ) पासून **दिनांक १४/०२/२०१२** (वार मंगळवार) पर्यत कार्यालयीन कामकाचे दिवशी कार्यालयीन वेळेत व **दिनांक १५/०२/२०१२** (वार- बुधवार) रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत रक्कम रु. १०००/- (एक हजार मात्र) ना परतावा तत्वावर भरणा केलेनंतर मिळू शकेल.

**निविदेसोबत अनामत रक्कम (बयाणा रक्कम व सुरक्षा अनामत)-**

निविदा सादर करताना निविदेसोबत बयाणा रक्कम रु. **५०,०००/-** (पन्नास हजार मात्र) **तहसीलदार सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर** यांचे नावे अहमदनगर येथे देय असलेला कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डि.डि.) आणि **रु.५.०० लक्ष** मात्र रकमेची जिल्हाधिकारी अहमदनगर या नावाने राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. निवीदा मंजूर झालेनंतर प्रत्येक वाहनासाठी अनामत रक्कम रु.**२०००/- ( दोन हजार मात्र**) त्वरीत भरावे लागतील.

**निविदा स्विकारण्याची अंतिम दिनांक व वेळ**

१) निविदा दिनांक **१५/०२/२०१२** रोजी **३-००** वाजेपर्यंत नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे स्विकारली जाईल. त्यानंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. सदरच्या निविदा दिनांक **१५/०२/२०१२** (वार- बुधवार ) रोजी दुपारी **४-००** वाजता नियोजन भवन / नगर निवास, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे उघडण्यात येतील.

२) निवीदा प्रत्यक्ष नायब तहसिलदार, टंचाई शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आणून दयाव्या लागतील. पोष्टाने प्राप्त होणा-या निवीदा स्विकारल्या जाणार नाहीत.

**निविदा सादर करण्याची पध्दती -**

निविदा ही दोन लिफाफे पध्दतीने सादर करावी लागेल. त्यापैकी लिफाफा क्र.१ हा तांत्रिक लिफाफा असेल व लिफाफा क्र.२ हा व्यापारी लिफाफा असेल. हे दोन्ही लिफाफे त्यातील कागदपत्रांसह सीलबंद करुन त्यावर स्पष्टपणे तांत्रिक लिफाफा / व्यापारी लिफाफा असे नमूद करणे आवश्यक आहे. हे दोन्ही सीलबंद लिफाफे तिस-या एका मोठया लिफाफ्यात ठेवून तो सीलबंद करावा व त्या लिफाफ्यावर जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगरकरिता पाणी पुरवठा निविदा २०११-२०१२ असे नमूद करण्यात यावे. तसेच प्रत्येक लिफाफ्यावर निविदा सादर करण्या-याचे नांव, पत्ता लिहिण्यात यावा.

**निविदाकाराची स्वाक्षरी**

तांत्रिक व व्यापारी लिफाप-यात खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.

**<u>अ) तांत्रिक लिफाफा -</u>**

तांत्रिक लिफाप-यात खालील कागदपत्रे सादर करावीत.

१) बयाणा रक्कम रु.५०,०००/- (पन्नास हजार मात्र) **तहसीलदार सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर** यांचे नावे अहमदनगर येथे देय असलेला कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डि.डि.) व सुरक्षा अनामत रक्कम रू. ५ लक्ष मात्रची राष्ट्रीयकृत बँक गॅरंटी.

२) दिनांक ३१/३/२०११ अखेर आयकर बाकी नसलेबाबतचा प्रमाणपत्र व पॅन नंबर

३) स्वतःचे मालकीचे ट्रकचे नंबरसह यादी व कागदपत्रे, तसेच निविदा सादर करणायाकडे इतरांची वाहने असतील तर त्यांचे रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर संमतीपत्रक किंवा करारनामा.

४) निविदाधारक संस्था असेल तर संस्था नोंदणी प्रमाणपत्र, बायलॉज, रोख भांडवलाचा तपशिल तसेच प्रपत्र-ई सोबत जोडावे.

५) सहकारी संस्थेचे सर्व संचालकांचे संमतीपत्र सोबत सादर करावीत.

६) मागील तीन वर्षाचे सनदी लेखापाल (C.A.) यांचे स्वाक्षरीचा लेखा परिक्षण तपासणी अहवाल

७) यापूर्वी शासकिय/निमशासकिय/खाजगी संस्थांना पाणी पुरवठा केला असल्यास तर तसा अनुभवाचा दाखला सादर करावा.

८) वाहनांचा वाहनकर आणि विमा ३१/०३/२०१२ पर्यंतच्या कालावधीचा भरणा केल्याबाबतचा लेखी पुरावा.

९) निविदेचे अटीपत्रक मान्य असलेबाबत प्रपत्र ब प्रमाणे १०० रु. स्टॅम्पपेपरवरील प्रतिज्ञापत्र.

१०) निविदाधारकाने एखाद्या व्यक्तीस निविदेवर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत केले असल्यास Bidder’s Power of Attorney (प्रपत्र-ड) भरुन देणे आवश्यक आहे.

११) प्रपत्र क मध्ये नमूद केल्याप्रमाणे निविदाधारकाची माहिती

१२) मूळ निविदा फॉर्म प्रपत्र-अ वगळून (प्रत्येक पानावर निविदाधारकाने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.)

वरील सर्व कागदपत्रे पहिल्या लिफाफ्यामध्ये ठेवून त्यावर तांत्रिक लिफाफा असे नमूद करावे. तांत्रिक लिफाप-यातील कागदपत्रांची पूर्तता झाल्यावरच व्यापारी लिफाफा उघडण्यात येईल.

**(ब) <u>व्यापारी लिफाफा</u> (दराबाबतचा लिफाफा):-**

१) निविदेसोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये वाहतुकीचे दर नमूद करावेत.

२) दरासंबंधीचे निविदा फॉर्ममध्ये दर सादर करताना कोणतीही गिरवागिरव किंवा खाडाखोड करण्यात येऊ नये.

वरील कागदपत्रे दुसया लिफाफ्यामध्ये टाकून त्यावर व्यापारी लिफाफा असे नमूद करावे. पहिला तांत्रिक लिफाफा असावा व दुसरा व्यापारी / दराचा लिफाफा असावा व हे दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाप-यामध्ये टाकावेत व त्यावर **<u>जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगरकरिता पाणी वाहतूक निविदा २०११-२०१२</u>** असे नमूद करावे.

**निविदाकाराची स्वाक्षरी**

**<u>निविदेतील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत -</u>**

१) वाहन टाकीसह ट्रक सुस्थितीत असणे आवश्यक आहे.

२) कमीत कमी ५० वाहने उपलब्ध करुन द्यावे लागतील. सदरचे वाहनांपैकी किमान ६ वाहने ही निविदाधारकाच्या स्वतःच्या मालकीची असावीत. उर्वरीत वाहनांसाठी सदर वाहनमालकांचे रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर संमतीपत्रक/ करारनामा निविदेसोबत सादर करावा.

३) निवीदा मंजूर झालेनंतर मंजूर निविदाधारकास प्रत्येक वाहनासाठी अनामत रक्कम रु.२०००/- (दोन हजार मात्र) आपली निविदा स्विकृत झाल्याचे कळविण्यात आल्यानंतर आठ दिवसात भरावे लागेल.

४) शासन निर्णय क्रमांक-टंचाई-१००८-प्रक्र-४८/पापु-१४ दिनांक ११ जून, २००९ पासून खाजगी टँकर व ट्रकचे द्यावयाचे दर निश्चित करण्यांत आलेले आहेत. शासन निर्णयातील अट क्रः १ नुसार पुरविलेल्या प्रत्येक ट्रक वर बसविलेल्या पाण्याच्या टाकीची वहन क्षमता ही उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेमार्फत प्रमाणित करुन घेणे बंधनकारक राहील.

५) प्रत्येक ट्रक वर बसविलेल्या पाण्याच्या टाकीची पाणी वाहून नेण्याच्या क्षमतेनुसार व तो ट्रक प्रत्यक्षात किती पाणी आणतो. हे लक्षात घेवून मंजूर केलेल्या दराच्या प्रमाणात प्रतिदिन भाडे व प्रति किलोमीटर भाडे आवश्यक ती पडताळणी केल्यानंतर अदा करण्यांत येईल.

६) वाहनावर काम करणा-या कर्मचायांचे ( अधिकृत वाहन चालक व मदतनिस ) वेतन व भत्ते तसेच वाहनासाठी लागणारे तेल व इंधन वाहन मालकांनेच अदा करावयाचे आहेत. **यासाठी वाहनामध्ये इंधन भरणेबाबत निविदाधारकाने स्वतंत्र व्यवस्था करावी. कुठल्याही परिस्थितीत शासनाकडून इंधनाचा पुरवठा केला जाणार नाही.**

७) मंजूर झालेल्या निविदा धारकास रु.१००/- किंमतीचे मुद्रांक स्टँपपेपरवर करारनामा आठ दिवसात करुन द्यावा लागेल. सदरचा करारनामा उपनिबंधक यांचेकडे नोंदवावा लागेल.

८) निविदाधारकास ठरवून दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करावे लागेल, अन्यथा निविदाधारकाची निविदा रद्द करणेत येवून सदरचे काम दुस-या ठेकेदाराकडून करुन घेण्यात येईल. त्यासाठी होणारा जादा खर्च मूळ ठेकेदाराकडून वसूल करणेत येईल.

९) पिण्याच्या पाण्याची वाहतूक अहमदनगर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त क्षेत्रात जिथे पाणी उपलब्ध असेल त्या ठिकाणाहून करावी लागेल. काही कारणास्तव पाणी पुरवठा बंद असल्यास त्या कालावधीचे भाडे देण्यात येणार नाही.

१०) शासन नियमाप्रमाणे बिलातून आयकर व त्यावरील सरचार्ज कापून घेणेत येईल. आयकर खात्याने आयकर अथवा व्याजाची किंवा दोन्हीही मागणी केल्यास त्याची भरपाई निविदाधारकास करावी लागेल.

**निविदाकाराची स्वाक्षरी**

११)  वाहनाचा दुरुस्ती व देखभाल खर्च वाहन मालकांना करावा लागेल व वाहन दुरुस्ती तात्काळ करावी लागेल. पाणी वाहतूकीत खंड पडता कामा नये. जर वाहन ताबडतोब दुरुस्त होणार नसेल तर त्याऐवजी पर्यायी व्यवस्था करावी लागेल.

१२)  वाहनास कुठल्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकांची राहील. त्याबाबतचे नुकसान भरपाईस निविदाधारक सर्वस्वी जबाबदार राहील. त्यासाठी शासनाकडून कोणताही मोबदला नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

१३)  पुरविलेल्या वाहनाचे स्पिडोमिटर सुस्थीतीत ठेवणे आवश्यक आहे.

१४)  संबंधित प्राधिकृत अधिकारी ठरवतील त्याप्रमाणे पाण्याचे वाटप व खेपा कराव्या लागतील.

१५)  प्रत्यक्षात वाहन पुरविण्याचे आदेश दिल्यास त्या आदेशाच्या दिनांकापासून २४ तासामध्ये वाहन आदेशात ठरवून दिलेल्या ठिकाणी उपलब्ध करुन द्यावे लागेल. आवश्यकतेनूसार वाहन लावण्याचे अथवा बंद करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांचे राहतील. केवळ निविदा मंजूर झाली म्हणून कामाचा आग्रह धरता येणार नाही.

१६)  प्रत्यक्ष वाहन पुरविण्याचे आदेशाच्या दिनांकापासून २४ तासामध्ये वाहन आदेशात ठरवून दिलेल्या ठिकाणी उपलब्ध करुन द्यावे लागेल.  २४ तासामध्ये वाहन उपलब्ध करुन न दिल्यास प्रतिदिन प्रतिटँकर रु. २,०००/- याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.  तसेच विहीत वेळेत वाहन उपलब्ध न केल्यामुळे खाजगी टँकरने पाणीपुरवठा करावा लागल्यास त्याचा खर्च ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.  ठेकेदाराकडून करारनाम्याप्रमाणे पूर्ण क्षमतेने काम करुन घेण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी यांची राहिल.  त्यासाठी टँकरचा मार्ग ठरविणे, खेपांची संख्या ठरविणे याबाबतचे नियोजन गटविकास अधिकारी हे करतील व ते ठेकेदारावर बंधनकारक राहिल.  टँकरला देण्यात येणारे प्रतिदिन व प्रतिकिमी भाडे हे १ मे.टन एककाच्या प्रमाणात देण्यात येईल.

१७)  पिण्याचे पाणी वाहतुकीचा कालावधी या कार्यालयाचे आदेश दिलेपासून दिनांक ३१/१२/२०१२ अखेर किंवा टंचाई कालावधी संपेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील.

१८)  निविदेमध्ये नमुद केलेले दर सर्व समावेशक असावेत. त्याबाबत इतर कोणतीही वेगळी भरपाई दिली जाणार नाही. मंजूर झालेल्या निविदेतील दरामध्ये वाढ केली जाणार नाही.

१९)  निविदाधारक / सहकारी संस्था यांना काळ्या यादीत घोषित केलेले असल्यास अशा निविदाधारक / सहकारी संस्था यांनी निविदा भरु नये. असे आढळून आल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही व रद्द समजण्यात येईल.

२०)  निविदा मंजूर झाल्यानंतर निविदा धारकास जलवाहिनीवर “ महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा ” असा ठळक अक्षरात बोर्ड वाहनाच्या दर्शनी भागावर लावावा लागेल.

२१)  जिल्हयात पाणी पुरवठा करतांना वाहनांस पडणारा (Toll Tax) पथकर निवीदाधारकास भरावा लागेल.

२२)  वाहनाचे लॉगबुक दोन प्रतीत ठेवावे लागेल. त्यापैकी एक प्रत पाणी पुरवठा चालू असलेल्या गावी व दुसरी प्रत वाहनासोबत ठेवावी लागेल.

**निविदाकाराची स्वाक्षरी**

२३)  निविदाधारकाने सादर केलेले दर हे निविदा उघडण्याच्या दिनांकापासून ९० दिवसापर्यंत स्विकृतीस पात्र (विधीग्राहय) रहातील.

२४)  निविदा फॉर्म पूर्णपणे बिनचुक भरणे आवश्यक आहे. निविदा धारकाने निविदेमध्ये नमूद करावयाचे दर हे अंकी व अक्षरी अशा दोन्ही पध्दतीने मराठी / इंग्रजी यापैकी एका भाषेत लिहिणे आवश्यक आहे.  अंकी व अक्षरी दरामध्ये तफावत असल्यास जो दर कमी असेल तो गृहित धरण्यात येईल.  दर हे भारतीय रुपयामध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

२५)  सादर करावयाचे दर हे मूळ निवीदा फॉर्मसोबतच व विहित केलेल्या नमुन्यातच सादर करावे लागतील. निविदा फॉर्मच्या प्रत्येक पानावर निविदा धारकाने किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

२६)  निविदाधारक संस्था किंवा व्यक्ती असेल व तिच्या वतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदेसंबधीच्या सभांना उपस्थित रहाण्यास किंवा तांत्रिक व इतर माहिती पुरवण्यास एखादया व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्या संबधिचे निविदाधारकांचे प्राधिकारपत्र ( Bidders Power of Attorney)  देणे आवश्यक आहे.

२७)  निविदाधारकाने निविदा सादर करतांना निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी/शर्ती, नियम याव्यतिरिक्त स्वतःची कोणतीही अट निविदेमध्ये समाविष्ठ करु नये.  अशा पध्दतीच्या सर्शत निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२८)  या निविदे संदर्भात निविदा प्रक्रियेचे दरम्यान किंवा निविदा स्विकृतीनंतर कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचा निर्णय अंतिम राहिल.

२९)  कोणतीही निविदा स्विकारण्याचा वा नाकारण्याचा तसेच निविदेतील अटी व शर्ती मध्ये बदल करण्याच्या अंतिम अधिकार जिल्हाधिकारी अहमदनगर  यांनी राखून ठेवला आहे.

३०)  खरेदी केलेला निविदा फॉर्म हा अहस्तांतरणीय आहे. ज्या व्यक्ती किंवा संस्थेने निविदा फॉर्म खरेदी केला असेल त्यांनाच निविदा सादर करता येईल.

३१)  करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास मा.जिल्हाधिकारी अहमदनगर ठरवतील ती रक्कम किंवा संपूर्ण सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल.

३२)  निविदाधारकाने निविदा प्रक्रियेवर परिणाम करेल अशा भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्यास किंवा निविदा प्रक्रियेशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारचे प्रलोभन दाखविणे, दबाव आणणे अशा मार्गाचा अवलंब केल्याचे जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आल्यास सदर निविदाधारकाची निविदा अपात्र करण्यात येईल.

३३)  बयाणा रक्कम किंवा सुरक्षा अनामत यासाठी कोणत्याही प्रकारचे व्याज देय होणार नाही.

३४)  कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा निविदेतील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार मा.जिल्हाधिकारी यांनी राखीव ठेवला आहे.

**निविदाकाराची स्वाक्षरी**

# (प्रपत्र-अ)
# व्यापारी लिफाफा

## पिण्याचे पाणी वाहतूक करणेबाबतची निविदा.

( सन २०११ - २०१२ )    दिनांक -   / ०२ /२०१२

प्रति,

मा.जिल्हाधिकारी अहमदनगर

महोदय,

निविदेमधील अटी व शर्ती मी वाचल्या असून पिण्याचे पाणी वाहतूक करणेसाठीचे निविदेचे अनुषंगाने खालीलप्रमाणे दर सादर करीत आहे.

१) निविदाधारकाचे संपूर्ण नांव :
व पूर्ण पत्ता व दूरध्वनी क्र.

२) २४ तासाकरिता वाहनांचा आवश्यक दर आणि प्रती किलोमिटर करिता ठरलेला दर आणि फिरतीचा दर खालीलप्रमाणे आहे.

| टँकर/ट्रक वरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमता | कमाल प्रतिदिन भाडे (रुपये) २४ तासाकरिता | कमाल प्रति कि.मी भाडे (रुपये) |
|---|---|---|
| | | |
| | अंकी- | अंकी |
| | अक्षरी | अक्षरी |

निविदा फॉर्मचे सोबत जोडलेले नियम व अटी मी पूर्णपणे वाचल्या असून, त्या मला मान्य व बंधनकारक राहतील.

दिनांक :- / ०२/२०१२.
स्थळ :- अहमदनगर

(श्री. )
निविदा भरणा-याचे संपूर्ण नांव व स्वाक्षरी.
शिक्का

## प्रपत्र-ब-
## ( १०० रुपये स्टॅम्प पेपरवर द्यावयाचा मजकूर )

मी, ---------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------ याद्वारे शपथेवर निवेदन करतो की, मी मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामिण भागातील गावे / वाड्या / तांडे यांना पिण्याचे पाण्याचे टंचाई अंतर्गत दि. /०२/२०१२ रोजी काढलेल्या पिण्याचे पाण्याचे वाहतूकीचे निविदेतील अटी व शर्ती पूर्णपणे वाचून समजावून घेतलेल्या आहेत. पिण्याचे पाणी वहातूक निविदेतील अटी आणि शर्ती मला मंजूर असून त्या अटी व शर्तीचे मी पूर्णपणे पालन करील.

मी असेही शपथेवर निवेदन करतो की, पिण्याच्या पाण्याची टंचाई ही अतिसंवेदनशील बाब असल्याचे मला मान्य आहे. मी अहमदनगर जिल्ह्यातील गांवे, वाड्या, तांडे यांना माझी पिण्याचे पाण्याची वाहतूक निविदा मंजूर झाल्यास आवश्यकतेनुसार माझे स्वतःचे अथवा टँकर्स / ट्रक मालकासोबत केलेल्या करारनाम्याच्या आधारे इंधनासह वाहने पुरविल.

वरील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व सत्य आहे. मी आवश्यकतेप्रमाणे वाहने न पुरविल्यास निविदेत नमूद केलेल्या अटी आणि शर्तीनुसार दंडणीय कार्यवाहीस पात्र राहील. तसेच टँकर/वाहने न पुरविल्यास मी भा.द.वि.कलम १९९ व २०० प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. सदर मजकूर मी आज दि. / ०२/२०१२ रोजी मुक्कामी प्रमाणित केलेला आहे.

निविदा धारक यांची स्वाक्षरी
संपूर्ण नांव व पत्ता.

( सदरचा मजकूर विशेष कार्यकारी दंडाधिकारी, अहमदनगर यांचेसमोर नोंदविलेला असावा.)

(प्रपत्र-क)

# Bidder’s Information

**IN RESPONSE TO THE PRIVATE WATER SUPPLY BY TRUCK / TANKER TENDER NOTICE PUBLISHED BY THE COLLECTOR, AHMEDNAGAR READ WITH TERMS & CONDITIONS CONTAINED IN THE TENDER FORM**

1. Name in Full of the Tenderer :

   (in Block Letters)

2. Address of the Tenderer :

   :

   :

   :

Telephone No. : office ...............................

: Residence ........................

Mobile No. :

Fax No. :

3. Address for Communication :

Telephone No. : office Resi. ............................

Mobile No. :

Fax No. :

I / We have carefully read and understood the above terms and conditions of the Tender attached to this offer and form part of this Tender, which we accept unconditionally and accordingly, offer the price as above mentioned.

**Signature :------------------------**

**Name :**

**Date :**

**Designation :**

**Seal / Rubber Stamp of Organization**

(प्रपत्र-ड)

# BIDDER’S POWER OF ATTORNEY

To,

<Bidder’s Name>----------------------------------------------------------------------, <Designation>-------------------------------is hereby authorized to sign relevant documents on behalf of the company in dealing with Tender of reference <Tender No. & Date>------------------------------. He is also authorized to attend meetings & submit technical & commercial information as may be required by your in the course of processing above said tender.

Thanking You,

Authorized Signatory.

--------------------------------------------------------------

Tenderers
Seal

( प्रपत्र -ई)

# Banker's / CA's Certificate for Investible Funds

Ref :-------------------------------------------- Date : -----------------------

To,

In response to the Tender No. ----------------------------------dt.----------------- of the, Ahmednagar ---------------------------------- of The Private Water Supply By Truck / Tanker Tender, this is to certify that ---------------------------------------------------------------------------(Name of Bidder) is having balance of Rs. ------------------------------in their account & are capable of investing funds to the extent of Rs. -------------------------------(Ruppes --------------------------------------------------------) for the said tender.

DATE :

PLACE: SIGNATURE :

Taluka / FDO.

------------------------------------

(BANK'S COMMON SEAL)